# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२२**

**सन २०२२-२३ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२२**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**कपात सूचनांची एकूण संख्या - १७**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एन-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: १५०, रूपये:- १,०४,०४,९१,०००/-**<br>**ॲड. अशोक पवार** |
| (१) | ४४८७ | १० | शिरुर - हवेली मतदारसंघातील ( जि.पुणे ) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या अंमलबजावणीसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता असणे, परंतु याबाबत कोणतीही कार्यवाही न होणे यामुळे असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एन-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: १५१, रूपये:- २७,७३,४८,०००/-**<br>**श्री. चेतन तुपे** |
| (२) | ४३६८ | १० | पुणे शहरात प्रधानमंत्री आयुष्यमान भारत आरोग्य अभियानाअंतर्गत पात्र नागरीकांसाठी तयार केलेल्या कार्डांचे वाटप नेमके कोणी करावे, याबाबत असलेला सावळागोंधळ, हडपसर मतदारसंघातील नागरीकांच्या कार्डांचे गठ्ठेच्या गठ्ठे काही स्थानिक पूढाऱ्यांनी स्वत:च्या घरी आणि ऑफीसवर ठेवलेले असणे, त्यांच्याकडून कार्डे घ्या, असे अधिकाऱ्यांनी सांगितल्यामुळे पात्र जेष्ठ नागरीकांना पुढाऱ्यांकडे हेलपाटे मारावे लागत असून ४०० ते ५०० रुपये रिक्षा खर्चासाठी सहन करावा लागणारा आर्थिक भूर्दंड, सदर गैरप्रकारांना आळा घालून कुठल्याही मध्यस्ताविना ही कार्डे पात्र नागरिकांपर्यंत तातडीने पोहचविण्याची आवश्यकता व त्याबाबत करावयाची उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एन-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**बाब क्रमांक: १५३, रूपये:- १,०००/-**<br>**कुमारी प्रणिती शिंदे** |
| (३) | ४३०२ | १० | लेप्रेसी रुग्णाना विकलांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र देत असताना त्यांना ४० टक्केच्या वर अपंगत्व आहे का, अशी विचारणा व वैद्यकीय तपासणी केली जाणे, त्यामुळे त्यांच्या पसरलेली असंताषोची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने निर्णय घेऊन जे जन्मतः |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | कुष्ठ रुग्णाने ग्रासलेले असतील त्यांना प्रमाणपत्र देत असताना ते कुष्ठरोगी रुग्ण आहेत खात्री करून त्यांना विकलांग प्रमाणपत्र देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एन-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४३८५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**बाब क्रमांक: १५५, रूपये:- ७,८०,००,००,०००/-**<br>**श्री. संग्राम थोपटे** |
| (४) | ४३८५ | १० | राज्यात दिव्यांग व दुर्धर आजारातील पात्र लाभार्थ्यांसाठी तसेच निराधार लोकांसाठी संजय गांधी निराधार योजना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना इत्यादी राबविण्यात येत असून या योजनेच्या पात्रतेसाठी वार्षिक उत्पन्न रु.२१००० पर्यंत असण्याची मर्यादा असल्याने अनेक लाभार्थ्यांना या योजनेपासून वंचित राहावे लागत असणे, सद्यस्थितीत महागाईचा विचार करतात या योजनेसाठी निकषांमध्ये बदल करून वार्षिक उत्पन्नाची मर्यादा वाढविण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता व करावयाची उपायोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एन-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**बाब क्रमांक: १५६, रूपये:- ९०,००,००,०००/-**<br>**कुमारी प्रणिती शिंदे** |
| (५) | ४२९७ | १० | सामाजिक न्याय विभाग अंतर्गत येणाऱ्या संजय गांधी निराधार व श्रावणबाळ या योजनांसाठी अर्जदारास कुटुंबाची सद्याची वार्षीक उत्पन्न मर्यादा रुपये २१ हजार असल्याबाबतचा उत्पन्न दाखला सादर करण्याची अट असून या दोन्ही योजनासाठी शासनाने दि. ३० सप्टेंबर २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार त्यावेळेस असलेली १५ हजार रुपयाची वार्षिक उत्पन्न मर्यादा वाढवून २१ हजार रुपये इतकी केली असणे, त्यानंतर आजतागायत या उत्पन्न दाखल्याच्या मर्यादमध्ये वाढ झालेला नसणे, तसेच सद्यस्थितीमध्ये अर्जदाराना २१ हजारांचा उत्पन्न दाखला मिळत नसल्यामुळे लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहत असल्याने परिणामी लाभार्थ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन सन २००८ ते सन २०२२ या कालावधीमधील झालेल्या सामाजिक व इतर सर्व बदलांचा विचार करून कौटुंबिक उत्पन्न दाखल्याची २१ हजारांची मर्यादा वाढविणे गरजेचे असल्याने शासनाने यावर तात्काळ निर्णय घेण्याची आवश्यकता व करावयाची उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एन-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण यांवरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १६०, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. संजय जगताप** |
| (६) | ४४२९ | १० | पुणे जिल्हयातील पुरंदर तालुक्यातील सासवड हे केंद्रस्थानी असलेले ठिकाण आहे. येथे जिल्हयातील तालुक्यातील विविध गावांतून व भागातून विविध समाजाची मुले शिक्षण घेण्यासाठी येत असतात, यामध्ये अनुसूचित जातीच्या मुला-मुलींची संख्या जास्त आहे. याकरिता सासवड तसेच जेजूरी येथे एमआयडी(औद्योगिक) वसाहत आहे. याठिकाणी अनुसूचति जातीच्या मुला-मुलींसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था बांधकामाबाबत शासनाने करावयाची उपाययोजना. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (७) | ४२७९ | १० | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत शासन निर्णय क्र. सावियो-०२२/प्र.क्र. ३०/अजाक दि. ३ मार्च,२०२२ आणि शासन निर्णय क्र. सावियो-२०२२/प्र.क्र. ६६-१/अजाक दि. ३१ मार्च,२०२२ या दोन शासन निर्णया अन्वये एकूण ४२० लक्षची विकास कामे मंजूर असणे, मुख्य सचिवांचे पत्र दि. १८ जुलै, २०२२ अन्वये ही कामे स्थगित झालेली असणे,ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या गावांचा विकास करणेसाठी त्या ठिकाणी गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणेकरिता या कामांची नितांत गरज असणे, स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि. १५ ऑगस्ट २०२२ रोजी निवेदनाद्वारे या विकासकामांना दिलेली स्थगिती रद्द करून निधी मंजूर करण्याची मागणी केलेली असणे, येवला जि.नाशिक या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधांसाठी या कामांची नितांत गरज असल्यामुळे सदर कामांची स्थगिती रद्द करून निधी उपलब्ध करून देणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (८) | ४४०५ | १० | महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यांसाठी सर्व सुविधायुक्त स्वतंत्र निवासी शाळा बांधण्याची तरतूद असणे व त्यानुसार सामाजिक न्याय विभागाची पंचतारांकित व अद्ययावत शाळा एक आदर्श म्हणून राज्याच्या केंद्रस्थळी उभारणे अपेक्षित असणे, सदर शाळेतील अभ्यासक्रम हा स्पर्धात्मक दृष्ट्या राष्ट्रीय पातळीवरील असणे अपेक्षित असताना व याकरिता औरंगाबाद शहरालगत सामाजिक न्याय विभागाची स्वतःची जागा उपलब्ध असणे, सदर जागेत सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील मुला-मुलींसाठी स्वतंत्र प्रशस्त पंचतारांकित व सीबीएसई बोर्डाची शाळा उभारण्याबाबत हजारो विद्यार्थ्यांची व संघटनांची अपेक्षा असणे, यास अनुसरून औरंगाबाद येथील उपलब्ध जागेत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील मुला-मुलींसाठी पंचतारांकित मोफत निवासी सीबीएसई शाळा बांधकाम करून सुरू करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **कुमारी प्रणिती शिंदे** |
| (९) | ४२९९ | १० | शासनाचा योजनांचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांना प्रथमतः स्वतःचे पैसे खर्च करून संबंधित वस्तु (उदा. ट्रॅक्टर किंवा इतर वस्तु घ्यावी लागत असून त्यानंतर त्यांना शासनातर्फे महा DBT प्रणालीव्दारे अनुदान लाभार्थ्याच्या खात्यावर वितरीत करण्यात येणे, यामुळे लाभार्थ्याला लाभ घेण्याआधीच कर्जबाजारी होवून वस्तु विकत घ्यावी लागणे , परिणामी लाभार्थ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एन-४** |
| | | | **मुख्य लेखाशीर्ष: ४२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण यांवरील भांडवली खर्च** |
| | | | **बाब क्रमांक: १६१, रूपये:- १,०००/-** |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (१०) | ४३५१ | १० | ”ता.हवेली, जि.पुणे येथील आंबेगाव बु., खु व फुरसुंगी ही गावे पुणे शहरालगत व नव्याने पुणे महानगरपालिका हद्दीत समाविष्ठ होणे, या दोन्ही ठिकाणापासून जवळच नामांकित शाळा, महाविद्यालये असणे, व पुणे शहर विद्येचे माहेरघर व येथे सर्व प्रकारचे शिक्षण उपलब्ध असल्याचे बाहेर गावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त असणे, मात्र येथे वसतिगृहांची संख्या कमी असणे, त्यामुळे पुणे शहरात शिक्षणाकरीता इतर मागास प्रवर्गातील हुखार, गरजू, गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असणे, राज्य शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशन,२०२२ मध्ये जाहिर केल्याप्रमाणे केंद्र सरकारच्या बाबू जगजीवनराम छात्र आवास योजनेतून सदरील गावांत राज्यातील इतर मागास वर्गातील मेक्ट्रिकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे सुरु करण्यासाठी कार्यवाही व्हावी, अशी येथील जनतेची मागणी असतानाही त्यावरील कार्यवाहीत शासनाकडून होत असलेला विलंब, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपययोजना.” |
| | | | **श्री. चेतन तुपे** |
| (११) | ४३६९ | १० | पुणे शहरातील मागासवर्गीय मुला-मुलींसाठीच्या शासकीय वसतीगृहांची मोठ्या प्रमाणावर झालेली दूर्दशा, मोडून पडलेली दारे-खिडक्या, अत्यंत नादुरुस्त अवस्थेतील स्वच्छतागृहे, वारंवार तुंबणाऱ्या स्वच्छतागृहांमुळे रहिवासी विद्यार्थ्यांच्या आरोग्याला निर्माण झालेला धोका, विद्यार्थ्यांना अत्यंत निकृष्ठ दर्जाचे भोजन पुरविले जात असल्याच्या सातत्याने समोर येत असलेल्या तक्रारी, या बाबीच्या विरोधात विद्यार्थ्यांना वारंवार आंदोलने उपोषण करावे लागणे, त्यामुळे अभ्यासाचे होत असलेले नुकसान, वसतीगृहातील गैरव्यवस्थेच्या प्रकारांना आळा घालून विद्यार्थ्यांना दर्जेदार सेवा पुरविण्याची आवश्यकता आणि त्याबाबत तातडीने करावयाची उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. संग्राम थोपटे** |
| (१२) | ४३८८ | १० | पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यात मौजे भोलावडे हे गाव भोर शहरापासून जवळ असून या परिसरात अनेक शिक्षण संस्थांची महाविद्यालये असून अनेक मागासवर्गीय विद्यार्थीही बाहेरगावावरून भोर येथे शिक्षण घेत असून विद्यार्थ्यांची राहण्यासाठी अत्यंत अडचण होत असल्यामुळे यावर शासनाने तातडीने निर्णय घेऊन गावातील गट क्रमांक 610 मध्ये शासकीय जागेवर मंजूर असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वाढीव 200 बेडच्या वसतीगृह उभारणीसाठी तातडीने निधीची तरतूद करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१३) | ४३४९ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी येथे मागासवर्गीय मुलांसाठी वसतीगृह मंजूर करण्यात येणे, मात्र या वसतीगृहास अद्यापही निधी अप्राप्त असल्याने या वसतीगृहाचे बांधकाम करण्यात आलेले नसणे, ब्रम्हपूरी हे शहर शिक्षणाचे माहेर घर म्हणून ओळखले जात असल्याने या शहरात सर्व प्रकारच्या उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध असणे, त्यामूळे या ठिकाणी विद्यार्थी मोठया प्रमाणात शिक्षण घेण्यासाठी येत असणे, मात्र वसतीगृह अभावी गरिब विद्यार्थ्यांना आर्थीक व मानसिक त्रास सहन करावे लागत असून यामूळे उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागत असल्यामूळे नागरिकांत पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण त्यामूळे चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी येथे मंजूर असेल्या वसतीगृहास निधी उपलब्ध होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (१४) | ४३५० | १० | चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी येथे अनेक गावातील विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी मोठया प्रमाणात असणे, या ठिकाणी असलेले वसतीगृहात प्रवेश क्षमता कमी असल्याने अनेक विद्यार्थी वसतीगृहापासून वंचित राहत असल्याने त्यांच्या परिवारास आर्थिक व माणसिक त्रास सहन करावा लागत असणे, यामूळे नागरिकात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी ब्रम्हपूरी येथे पुन्हा नवीन वसतीगृह मंजूर करुन त्याचे बांधकाम करण्यासाठी पर्यात्प निधी उपलब्ध होण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एन-४** |
| | | | **मुख्य लेखाशीर्ष: ४२२५, अनूसूचित जाती, अनूसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण यावरील भांडवली खर्च** |
| | | | **बाब क्रमांक: १६२, रूपये:- १,०००/-** |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (१५) | ४४३१ | १० | पुणे जिल्हयातील पुरंदर येथील सासवड येथे अनुसूचित जाती व नवबौध्द मुला-मुलींकरीता शासकीय निवासी शाळा असून ही शाळा भाडेतत्वावर चालू असणे, या शासकीय निवासी शाळांना स्वत:ची इमारत नाही, तरी शासनाकडून चालवत असणाऱ्या या शाळेला इमारत बांधण्याकरीता निधीची तरतूद करावी. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एन-४** |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मुख्य लेखाशीर्ष: ४२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण यावरील भांडवली खर्च** |
| | | | **बाब क्रमांक: १६३, रूपये:- १,०००/-** |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (१६) | ४४१८ | १० | ''भिमा-कोरेगांव (जि.पुणे) येथे दरवर्षी लाखो लोक विजयस्तंभाचे दर्शन घेण्यासाठी येत असणे, येथे येणाऱ्या भाविकांसाठी मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी, कोरेगाव भिमा येथील सन 1818 च्या लढाईतील शुरविरांना अभिवादन करुन हा शौयाचा आणि पराक्रमाचा इतिहास पुढील पिढयांना माहिती होण्यासाठी समाजकल्याण आयुक्त, पुणे यांचेकडून स्मारकाचा सर्वकष बृहत विकास आराखडा शासन स्तरावर प्रलंबित असणे, शासनाने भिमा-कोरेगाव विजयस्तंभ स्मारकाचा विकास आणि सौंदर्यकरणासाठी उच्चस्तरीय समिती गठीत केलेली असणे, स्मारकासाठी आवश्यक असलेली भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता तसेच आवश्यकता त्या निधीची तरतूद पुरवणी मागण्याद्वारे करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना.'' |
| | | | **ॲड. अशोक पवार** |
| (१७) | ४४८८ | १० | शिरुर - हवेली मतदारसंघातील ( जि.पुणे ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बांधकामासाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता असणे, परंतु याबाबत कोणतीही कार्यवाही न होणे यामुळे असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २२ ऑगस्ट, २०२२**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई